दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

स्वच्छ विचार मनाला शांती देतात.



तुळजापूर शहरात जागोजागी कचऱ्याचे ढीग पेज ४

दैनिक | धाराशिव | वर्ष 2 रे | अंक 129 | बुधवार दि.18 जून 2025 | RNI NO -2023/90078 | पाने 04 | किंमत रू 5

# संकेतस्थळावरील अष्टभुजाकृतीची प्रतिमा काढा, १०८ फुटांच्या मूर्तीबाबत चर्चा करून निर्णय घ्या

## तीर्थक्षेत्र विकास आराखड्याबाबत पालकमंत्री सरनाईक यांचे निर्देश, मंत्रालयात बैठक, नवरात्र उत्सवात विकास प्रकल्पाचे भूमिपूजन





आरंभ मराठी | मुंबई


श्री क्षेत्र तुळजापूर विकास आराखड्यांतर्गत १०८ फुटाचे शिल्प उभारले जाणार आहे.या शिल्पामध्ये श्री.तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देत असल्याचे दाखवण्यात आले आहे. परंतु हे दाखवत असताना श्री. तुळजाभवानी मातेची प्रतिमा ही अष्टभुजाकृती दाखवण्यात आली आहे.याला अनेक भक्तगण व पुजारी मंडळांनी आक्षेप नोंदवला आहे. त्यांच्या भावनांचा आदर राखत संकेतस्थळावरील विकास आराखड्याच्या संकल्प चित्रातून ही प्रतिमा काढून टाकण्यात यावी, तसेच शिल्प तयार करताना पुरातत्व विभाग,इतिहास तज्ञ व अनुषंगिक घटकांशी चर्चा करून देवीची प्रतिमा कशी असावी याबाबत निर्णय घ्यावा असे निर्देश पालकमंत्री व तुळजापूर विकास प्रकल्पाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी संबंधितांना दिले. याबरोबरच यापुढे विकास आराखडा संदर्भात परस्पर प्रसिद्धी न देता अध्यक्षांच्या अनुमतीनेच देण्यात यावी,असे निर्देश त्यांनी यावेळी जिल्हाधिकारी यांना दिले

तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासंदर्भात मंगळवारी सकाळी मुंबईत पालकमंत्री सरनाईक यांनी बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, तुळजाभवानी मंदिर परिसराच्या विकास प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये करण्याचा मानस असून हा प्रकल्प पुढील तीन – साडेतीन वर्षात पूर्ण करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

### वर्षाला दीड कोटी भाविक, त्यांना चांगल्या सुविधा देऊ

यावेळी बोलताना पालकमंत्री श्री. सरनाईक म्हणाले की,महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवी,तुळजापूर हे पूर्ण शक्तिपीठ आहे.तसेच आई तुळजाभवानी क्षात्रतेजाची स्फूर्ती देवता,प्रेरणाशक्ती व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांची कुलस्वामिनी आहे. देशभरातून दरवर्षी सुमारे १ ते १.५ कोटी भाविक श्रीक्षेत्र तुळजापूरला भेट देत असतात.त्यांना भविष्यात चांगल्या सुख– सुविधा मिळाव्यात तसेच तुळजापूर शहराचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने १८६५ कोटी रुपये खर्चाचा तुळजापूर विकास आराखडा बनवला.या प्रकल्पामध्ये तुळजाभवानी मंदिर परिसर आणि संपूर्ण शहराचा सर्वांगीण विकास करण्याच्या सर्व गोष्टी अंतर्भूत करण्यात आलेले आहेत.

### स्थानिक आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची मुंबईतील बैठकीला दांडी



मंगळवारी पालकमंत्र्यांनी बोलावलेल्या मंत्रालयातील बैठकीला छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर,आमदार कैलास पाटील,आमदार प्रवीण स्वामी यांच्यासह धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषद मुख्याधिकारी मैनाक घोष, अतिरिक्त पोलीस अधीक्षक शफाकत आमना व संबंधित अधिकारी वृंद उपस्थित होते. मात्र, तुळजापुरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील या बैठकीला गैरहजरराहिले.

# फीससाठी विद्यार्थिनीचा अपमान,वर्गाबाहेर काढले

## अभिनव शाळेची मुजोरी, पालकाच्या तक्रारीनंतर चौकशी

आरंभ मराठी | धाराशिव

फी भरण्यासाठी विलंब झाल्याने शहरातील अभिनव इंग्लिश स्कूलच्या प्रशासनाने एका विद्यार्थिनीला अपमानास्पद वागणूक देत वर्गाबाहेर काढून घरी पाठवले. हा प्रकार मंगळवारी सकाळी घडल्यानंतर पालकाने शिक्षणाधिकाऱ्यांकडे शाळेची तक्रार केली. त्यानंतर शाळेच्या या बेशिस्त वर्तणुकीबाबत चौकशी लावण्यात आली आहे.दरम्यान, शाळेवर तातडीने कठोर कारवाई करावी अन्यथा आंदोलन केले जाईल असा इशारा मनसेचे दादा कांबळे यांनी दिला आहे.सचिन हरिश्चंद्र मोरे (रा.धाराशिव) यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुलगी कु. वेदिका सचिन मोरे इयत्ता ५ वी वर्गात अभिनव इंग्लीश स्कुल या ठिकाणी शिक्षण घेत असून फिस भरण्यास विलंब झाला असल्यामुळे मोबाईल क. ७०३०५६४४२१ या फोनद्वारे फिस भरणा करण्याकरिता मला फोन आल्यावर उद्या १८/०६/२०२५ रोजी फिस चा भरणा करतो असे सांगीतले. मात्र तरीही माझ्या मुलीस अपमानास्पद वागणूक देवून वर्गाच्या बाहेर काढण्यात आले व तिला घरी घेवून जा असे सांगितले. शासन निर्देशानुसार कोणत्याही विद्यार्थ्यांस अपमानास्पद वागणूक देता येत नाही तसेच विद्यार्थ्यांना वर्गाच्या बाहेर काढता येत नाही असे असताना अभिनव इंग्लीश स्कुलचे व्यवस्थापन माझ्या मुलींसह इतर अनेक विद्यार्थ्यांना वारंवार वर्गात सर्वांसमोर उभे करणे, सर्व विद्यार्थ्यांसमोर स्टेजवर उभे करून फी न भरलेबाबत अपमानास्पद वागणूक देणे असे प्रकार वारंवार करीत आहे.शालेय व्यवस्थापनाला योग्य ती समज द्यावी, योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. मोरे यांच्या या तक्रारीनंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तर दादा कांबळे यांनीही शाळेच्या व्यवस्थापन विरोधात कठोर कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी निधी मंजूर करा

## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे आनंद पाटील यांची मागणी



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला अधिकृत मान्यता मिळावी, यासाठी जिल्ह्याचे शिवसेनेचे नेते आनंद पाटील यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री तथा नगर विकासमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले. लागलीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क साधून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या.त्यामुळे धाराशिवमध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाला भरीव निधी मिळून शहराच्या वैभवात भर पडेल,असा विश्वास आनंद पाटील यांनी व्यक्त केला आहे

# तुरोरी येथे मेडिकलच्या गल्ल्यातील सव्वा लाख रुपये लुटले

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील तुरोरी येथील मेडिकलच्या गल्ल्यातील सव्वा लाख रुपये रक्कम अज्ञात व्यक्तीने लुटून नेल्याची घटना घडली. फिर्यादी व्यंकट अंजनया स्वामी (वय ५४ वर्षे, रा. तुरोरी) हे दिनांक २९ मे रोजी सायंकाळी चार ते पाच वाजण्याच्या सुमारास तुरोरी येथील ईश्वर मेडीकल स्टोअर उघडे ठेवून डब्बा आणण्यासाठी घरी गेले होते. त्यावेळी अज्ञात व्यक्तीने त्याचा फायदा घेवून व्यंकट स्वामी यांच्या मेडीकलच्या गल्ल्यातील १,२५,००० रुपये चोरुन नेले. व्यंकट स्वामी यांनी दिनांक १६ जून रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# मुलीवर सात वर्षे लैंगिक अत्याचार; अपप्रेरणा देणाऱ्या महिलेवरही गुन्हा दाखल


कळंब–तालुक्यातील एका गावातील एका मुलीवर सलग सात वर्षे लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. यासंबंधी अत्याचार करणाऱ्या तरुणासह पीडित तरुणीला अपप्रेरणा देणाऱ्या महिलेवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर वृत्त असे की, कळंब तालुक्यातील एका गावातील २४ वर्षीय मुलीवर (नाव– गाव गोपनीय) सन २०१७ ते ऑक्टोंबर २०२४ या काळात गावातील एका तरुणाने त्याच्या घरी पीडित मुलगी ही अल्पवयीन आहे ही माहित असतानाही तरुणाने तिला गर्भनिरोधक गोळ्या खावू घालून तिच्यावर वारंवार लैंगीक अत्याचार केला. त्यातील दुसऱ्या आरोपी महिलेने पिडीत तरुणीचे काहीही न ऐकता तिला अपप्रेरणा दिली आणि लैंगिक अत्याचार करण्यास मदत केली. पीडित तरुणीने दिनांक १६ जून रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम–६४(२),(एफ) (आय) (एम), ६९, ५५ पोक्सो कलम ४, ६, १६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# अवैध मद्य विरोधी आठ छापे; ५० लिटर गावठी दारू जप्त

धाराशिव–अवैध मद्य विरोधी पोलीस ठाणे हद्दीत ८ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले ४९ लिटर गावठी दारु,४०लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव व व देशी विदेशी दारुच्या १६३ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ४३,८१५ रुपये आहे.

# राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार अंगणवाड्यामध्ये नवा अभ्यासक्रम;अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण सुरू

आरंभ मराठी | धाराशिव



राज्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यानुसार ३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी आधारशिला बालवाटिका १, २ व ३ या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. अंगणवाडी सेविकांना याबाबत प्रशिक्षणही दिले जात आहे. या प्रशिक्षणाचे विविध टप्पे असून, त्यानुसार धाराशिव जिल्ह्यात निम्म्याहून अधिक सेविकांचे प्रशिक्षण झाले आहे. नवीन अभ्यासक्रमानुसार अंगणवाडी मध्ये अनौपचारिक शिक्षण जास्त दिले जाणार आहे. महिला व बालविकास विभाग आणि राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार केला आहे. शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय अगोदरच प्रसिध्द केला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून शालेय स्तरावर राष्ट्रीय शिक्षण धोरण राबवण्यात येणार आहे. त्यानुसार अंगणवाड्यांचे जिओ टॅगिंग महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटर (एमआरएसएसी) या संस्थेने विकसीत केलेल्या मोबाईल ॲपद्वारे सर्व शाळांचे जिओ टॅगिंग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार महिला व बालविकास विभागाकडील सर्व अंगणवाड्यांचे जिओ टॅगिंग करण्यात येणार आहे. अंगणवाड्यांचे स्थानांतर जिल्हा परिषद शाळांमधील रिकाम्या अतिरिक्त वर्गखोल्यांमध्ये करण्याबाबत प्रयत्न केले जाणार आहेत. खेळ गट, छोटा गट, मोठा गट या पूर्व प्राथमिकच्या वर्गासाठीही अभ्यासक्रमांची निर्मिती तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. नवीन अभ्यासक्रमामुळे पूर्व प्राथमिक शिक्षण आता शासनाच्या नियंत्रणात येणार आहे. त्यामुळे काय शिकवावे, कुणी शिकवावे आणि कसे शिकवावे याच्या दिशा स्पष्ट होणार आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार बारावी उत्तीर्ण अंगणवाडी सेविकांसाठी सहा महिन्यांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र, तर बारावीपूर्व पात्रतेच्या सेविकांसाठी एक वर्षाचा पदविका कार्यक्रम राज्य परिषदेच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. अभ्यासक्रमासाठी आवश्यक मार्गदर्शक पुस्तिका, प्रशिक्षण साहित्य आणि पूरक साहित्य अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना प्रशिक्षणादरम्यान प्रदान करण्यात येत आहे. नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांचा मानसिक विकास तीन ते सहा या वयातच करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत.

# सिम्बायोसिसच्या मदतीने जिल्ह्यात सॅटेलाईट स्किल सेंटर

## ‘मित्र’चे उपाध्यक्ष व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात ‘सॅटेलाईट स्किल सेंटर’ करण्याच्या प्रस्तावास पुणे येथील सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठाने मान्यता दिली आहे. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीत धाराशिव जिल्ह्यातील युवकांसाठी आधुनिक शेती व प्रक्रिया उद्योग सह उद्योगानुकूल प्रशिक्षण, जागतिक दर्जाचे कौशल्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने रोजगाराच्या संधी यानिमित्ताने उपलब्ध होणार असल्याची माहिती ‘मित्र’चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ स्वाती मुझुमदार,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रकाश अहिरराव,तहसीलदार अरविंद बोळंगे,मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांच्यासह सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठाच्या विविध विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांशी व्यापक चर्चा करण्यात आली. धाराशिव जिल्ह्यात ‘सॅटेलाईट स्किल सेंटर’ सुरू करण्याच्या प्रस्तावावर विशेष भर देण्यात आला. या उपक्रमांतर्गत उद्योग, विद्यार्थी, स्थानिक लोकसंख्या आणि विविध घटकांसाठी व्यावसायिक आणि कौशल्यात्मक प्रशिक्षण देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले आहे. जिल्ह्यातील युवकांना उद्योगानुकूल प्रशिक्षण, जागतिक दर्जाचं कौशल्य, शेती व प्रक्रिया उद्योग क्षेत्र तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुणे येथील सिम्बायोसिस स्किल अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये ही उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती.

### टेक्सटाईलसाठी सहकार्य

सिम्बायोसिसचे जगातील टेक्निकल टेक्स्टाईल क्षेत्रातील अनेक मोठ्या उद्योगांबरोबर संबंध असल्याने ते कौडगाव येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरू होत असलेल्या टेक्निकल टेक्सटाईल पार्कमध्ये गुंतवणूकदार आणण्यास देखील सहकार्य करणार असल्याचे या बैठकीत ठरले आहे.

# उथळ वृत्तवाहिन्यांनी फुगवलेला फुगा




एप्रिल महिन्याचा पहिल्या आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनसे नेते राज ठाकरे यांची, त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. बराच वेळ दोन्ही नेत्यांमध्ये नेहमीप्रमाणे 'बंद दाराआड' चर्चा झाली. नंतर 'डीनर डिप्लोमसी'ही झाली. सदरची भेट राजकीय नव्हती, असे दोन्ही कडूनही त्यावेळी सांगितले गेले. पण, महानगरपालिका निवडणुका जवळ आल्याने ही भेट योग्य रणनीती ठरवण्यासाठीच होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. नंतर 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी 'शिवसेना-मनसे' युती होणार, अशा बातम्या देण्यास सुरुवात केली. याचा धुरळा खाली बसतो ना बसतो तोच, ३ दिवसांनंतर एका पॉडस्काटवर प्रसिद्ध अभिनेते, निर्माते म हेश मांजरेकर यांनी मनसे नेते राज ठाकरे यांच्या घेतलेल्या मुलाखतीचा काही भाग वृत्तवाहिन्यांवर दाखवण्यात आला. त्यात उध्दव ठाकरे आणि आपण एकत्र येणार का? या प्रश्नाला उत्तर देताना, राज ठाकरे म्हणाले की, ' महाराष्ट्र खुप मोठा आहे. त्याच्या पुढे आमची भांडणे किरकोळ आहेत'. यात राज ठाकरे यांनी स्पष्टपणे युती करू किंवा तयार आहे, असे म्हटले नाही. काही तासांतच काम गार सेनेच्या एका कार्यक्रमात बोलताना उध्दव ठाकरे म्हणाले की, ' मीही सर्व विसरायला तयार आहे. पण, राज यांनी गद्दारांशी आणि भाजपशी संबंध ठेवणार नाही. कोणालाही घरी बोलवणार नाही. कोणालाही पाठिंबा देणार नाही, अशी शिवरायांपुढे शपथ घ्यावी', असा 'अटी' आणि 'शर्थी'चा गतिरोधक उभा करून मनसेबरोबर जाण्याचे संकेत दिले. खरेच मराठी माणसासाठी एकत्र यायचे असेल तर, मंत्रिपद नको, लाल दिव्याची गाडी नको, सत्ता नको. फक्त मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र येत आहोत, अशी जाहीरपणे उध्दव ठाकरे शपथ घेतील का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. त्यानंतर अजित पवार आणि शरद पवार एका बैठकीसाठी एकत्र आले. पुन्हा वृत्तवाहिन्यांच्या हाती कोलीत मिळाले; आणि दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार, असा सूर आळवण्यास सुरुवात केली. तेव्हापासून ते आजपर्यंत झाडून सर्व वृत्तवाहिन्यांवर 'उबाठा-मनसे' आणि 'शरद पवार-अजित पवार' एकत्र येणार याच विषयाचे रवंथ चालू आहे. वृत्तच नव्हे तर, निरर्थक चर्चांच्या फैरीही झडत आहेत. संजय राऊत यांनीही राज यांच्या भूमिकेचे समर्थन केले. परंतु, 'मनसे' आणि 'उबाठा' गटाच्या काही नेत्यांनी मात्र नाराजी व्यक्त केली. मात्र, अंधभक्त असलेले कार्यकर्ते मात्र सुखावले. काहींनी तर 'युती होणारच' या विश्वासाने राज आणि उद्धवचे एकत्र बॅनरही झळकावले. डोंबिवली आणि नाशकात एकमेकांच्या कार्यक्रमातही सामील झाले. गमतीची गोष्ट म्हणजे, राज ठाकरे हे बाली या देशात गेलेले होते. त्या पाठोपाठ उध्दव ठाकरेही सहकुटुंब सहपरिवार नित्यनियमाप्रम ाणे लंडनमधील 'मातोश्री-३' कडे रवाना झाले. नेते, प्रवक्ते, कार्यकर्त्यांत मात्र 'वाक् युध्द' रंगले.राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो. तसेच, राजकारणात केव्हाही काहीही घडू शकते, हे जरी खरे असले तरी 'उध्दव आणि राज' एकत्र येणे हे कदापिही शक्य नाही. दोघांमधून विस्तवही जात नाही, त्यामुळे ३६ चा आकडा ६३ होणे अशक्यप्राय गोष्ट आहे. थोडक्यात, हा प्रकार म्हणजे वृत्तवाहिन्यांनी पुन्हा एकदा 'शिळ्या कढीला ऊत' आणण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. यापूर्वीही २०१७ आणि २०१९ मध्ये असे प्रयोग झाले होते. आपल्या मराठी समाजाला 'भाऊबंदकी' ही सर्वात मोठी लागलेली 'कीड' आहे. पूर्वापार ती चालत आलेली आहे. प्रसंगी एकमेकांचे मुडदेही पडल्याचे अनेक उदाहरणे आहेत. राज हे उध्दवच्या हाताखाली काम करण्यास कधीच तयार होणार नाहीत. तेच जर करायचे होते तर, त्यांनी शिवसेना सोडून 'मनसे'ला जन्म देण्याचा आटापिटाच केला नसता. आज दोघांचेही पाय खोलात आहेत. भाजपने तगडे आव्हान त्यांच्यापुढे उभे केले आहे. शिंदे आणि अजितदादा येऊन मिळाल्यामुळे अजूनच अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे. दोघांच्याही अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे क्षणभर असे जरी मानले, की दोघांची युती झाली. पण, नेतृत्व, जागावाटप याचे काय? दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना दोन्ही भाऊ एकत्र यावे किंवा युती व्हावी, असे कितीही वाटत असले तरी ते शक्य वाटत नाही. दोन भाऊ एकत्र येणे म्हणजे एखाद्या पक्षाचे विलिनकरण करावे लागेल. ते होणे नाही. युती म्हटले तर, नेतृत्वाचा प्रश्न उभा राहिल. २०१७ मध्ये मुंबई महानगरपालिकेत 'किंगमेकर'च्या भूमिकेत मनसे असताना, सत्तेसाठी एका रात्रीत उध्दव ठाकरे यांनी मनसेचे फोडलेले ६ नगरसेवक, माहीम विधानसभा मतदार संघात अमित ठाकरे यांना न दिलेला पाठिंबा या आणि अशा इतर टीका-टीपण्ण्या, घटना दोघे इतक्या सहजासहजी विसरतील का? हाही मोठा प्रश्न आहे. 'राज ठाकरेंच्या सभांना गर्दी होते पण, मते मिळत नाहीत' असे विधान करत शरद पवार यांनी 'मनोमिलना'त खोडा घातलाच आहे. राज आणि उद्धव यांच्यात अजूनही युतीसंदर्भात बैठक झाली नाही. युतीच्या टीका-टीपण्णीवरून प्रकाश महाजन आणि नारायण राणे यांच्यात चांगलीच खडाजंगी झाली. त्याचा फायदा 'उबाठा'ला होऊ नये म्हणून, योग्य वेळ साधत राजकारणातील चाणक्य' फडणवीस यांनी राज यांची भेट घेऊन उध्दव ठाकरे यांना चांगलीच धोबीपछाड दिली, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. राज ठाकरे आणि भाजप यांची जवळीक बघता ही बैठक राजकारणाला वेगळे वळण देईल, असे वाटणे चुकीचे ठरणार नाही. नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रवादीच्या (शरद पवार) वर्धापनदिनाच्या मेळाव्यात दस्तुरखुद्द शरद पवारांनीच दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीला पूर्णविराम दिला आहे. त्याचप्रमाणे आज 'उबाठा-मनसे'च्या 'मनोमिलना'च्या कितीही चर्चा होत असल्या तरी, या दोघांत युती होणार नाही, ही 'काळ्या दगडावरची पांढरी रेघ' आहे. 'उथळ' वृत्तवाहिन्यांनी 'फुगवलेला हा फुगा' फडणवीस यांनी योग्य वेळ साधून राज यांची भेट घेऊन फोडला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. फडणवीस यांनी मारलेल्या 'मास्टर स्ट्रोक' मुळे शेवटी हे 'पेल्यातील वादळ'च ठरले, हे मात्र नक्की.

- प्रदीप व्ही. खोलमकर,
नाशिक.
मोबाईल- ८७६७५९२९८०

## राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचतर्फे अनाथ विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप



आरंभ मराठी | मुरुड

बोरगाव काळे येथे राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंच,माटेफळ यांच्या वतीने एक सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत गावातील अनाथ व गरजू अशा २० विद्यार्थ्यांना स्कूल किटचे वाटप करण्यात आले. किटमध्ये शालेय बॅग, अर्धा डझन वह्या, अर्धा डझन रजिस्टर, पाच पेन, पेन्सिल, कंपास, पाणी बॉटल आणि इतर शैक्षणिक साहित्याचा समावेश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच छायाताई देशमुख होत्या. यावेळी राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचचे संस्थापक अध्यक्ष बापू खोसे, अमेरिका येथे कार्यरत असलेले सॉफ्टवेअर अभियंता गोविंद हिंगे,अर्जुन कांबळे, बिभीषण घोडके,काशिनाथ खोसे,मोहन खोसे,विमल गौतम लकडे, रयतेचे स्वराज्य संघटनेचे राज्य संघटक ज्ञानेश्वर काळे,विलास कारखान्याचे संचालक रमेश देशमुख,माजी आरोग्य विस्तार अधिकारी सतीश देशमुख,खंडाळा तंटा मुक्ती अध्यक्ष भैरवनाथ झाडके,अण्णासाहेब शिंदे,राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष श्रीकांत पवार,ज्ञानेश्वर देशमुख,बच्चेसाहेब देशमुख आदी उपस्थित होते. कार्यक्रमावेळी गावची कन्या सॉफ्टवेअर अभियंता श्रुती सतीश देशमुख यांनी सामाजिक कार्यासाठी संस्थेला पाच हजार रुपयांची मदत केली. त्यांच्या या सहकार्यामुळे संस्थेचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले. वर्षभर लागणारे शैक्षणिक शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्यफुलल्याचे दृश्य भावनिक व आनंददायक ठरले. या कार्यक्रमाचे आयोजन राजश्री शाहू मंचाचे अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी केले. यासाठी माजी चेअरमन दीपक काळे,निळकंठ काळे पत्रकार बाबासाहेब काळे, यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. समाजातील दुर्बल घटकांना मदतीचा हात देण्याचा मानस मंचाचा आहे आणि भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.यावेळी उपस्थितांनी हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी उमेश देशमुख,करण साखरे,परमेश्वर काळे, दिलीप आदमाने,संदीपान फोलाने,दत्ता काळे,गोविंद आदमाने,शंकर ढोले पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## आळणी शाळेत विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक

आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील आळणी येथील जीवनराव गोरे माध्यमिक विद्यालयात नूतन विद्यार्थ्यांचे बैलगाडीतून स्वागत करण्यात आले. संपूर्ण आळणी गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर प्रशालेत नूतन विद्यार्थ्यांचे औक्षण केले, त्यानंतर विध्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या पुस्तके वाटप तसेच जिलेबी वाटून विध्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी गावचे सरपंच प्रमोद वीर,प्रशालेच मुख्याध्यापक मडके,सुधीर वीर, मनोज वीर, उमाकांत फुगारे, नवनियुक्त क्रीडा शिक्षक योगिनी फुगारे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## माजी सैनिकांनी शाळांमध्ये बेसिक मिलिटरी ट्रेनिंगसाठी नोंदणी करावी

### सैनिक कल्याण विभागाचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील माजी सैनिकांनी त्यांच्या गावातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना महिन्याच्या शेवटच्या शनिवारी बेसिक मिलिटरी ट्रेनिंग (Basic Military Training ) देण्यासाठी स्वेच्छेने पुढे यावे,असे आवाहन सैनिक कल्याण विभाग,पुणे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन विभाग व माजी सैनिक कल्याण मंत्रालयाने केले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक माजी सैनिकांनी आपले नाव, पत्ता, ई-मेल आयडी व संपर्क क्रमांकासह लवकरात लवकर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे नोंदणी करावी.त्यांच्या सखोल अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळून देशसेवेसाठी नवे योगदान मिळू शकते.अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्रमांक ०२४७२-२२३५५७ व भ्रम णध्वनी क्रमांक ७५८८५२७५५४ वर संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.

## रस्ते-पूल विकासाचे मार्ग की धोक्यांचे?

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमाळा या पर्यटन स्थळावर जाण्यासाठी इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल कोसळून मोठी दुर्घटना घडली. त्यात चार पर्यटक ठार झाले असून, सहा पर्यटक गंभीर जखमी तर पन्नासहून अधिक पर्यटक पुलावरून कोसळल्यामुळे ते जखमी झालेत. यात अनेक जण वाहून गेल्याची ही शंका व्यक्त केली जात आहे. या दुर्दैवी घटनेनंतर सदर पुल हा धोकादायक होता हे स्पष्टचं होत आहे. कुंडमाळा येथील इंद्रायणी नदीवरील पुल हा चारशे सत्तर फुटांचा आहे. तो पुल दोन टप्प्यांत असून शंभर- शंभर फुटांचे दोन लोखंडी साकव, तर दोनशे फुटांचा सिमेंटचा रस्ता व पुलावरील आतली रुंदी एका वेळेस एक दुचाकी दोन माणसे जाईल एवढीच असल्याचे सांगितले जाते. दुर्घटनेच्या प्रसंगी या पुलावर दीडशे- दोनशे पर्यटक, काही दुचाकी वाहने एकाच वेळी जमल्यामुळे ओव्हरलोड सहन झाल्यामुळे हा पूल खळखळत्या इंद्रायणीच्या पात्रात कोसळल्याने ही दुर्घटना घडली. मागील दोन आठवड्यांपासून पुणे जिल्ह्यात दम दार पाऊस झाल्यामुळे निसर्ग सौंदर्य फुलले फुलून गेले आहे. मावळ परिसर निसर्ग संपन्न असून दरवर्षी पर्यटक संपूर्ण जिल्ह्यातूनच नव्हे तर मुंबई -ठाणे परिसरातून सुद्धा मोठ्या संख्येने येतात. एकंदरीत पर्यटकांची शनिवार रविवार या सुट्टीच्या दिवशी मोठ्या संख्येने गर्दी होत असते. निसर्ग सौंदर्याने भरलेल्या सह्याद्रीच्या डोंगर भागात पर्यटनाला मोठी चालना आहे. मात्र गर्दीचे व्यवस्थापन व व सुरक्षिततेचा अभाव हा प्रतिवर्षी दिसून येतो. इंद्रायणी नदीच्या पात्रात असलेले कुंडजाई मातेचे मंदिर आणि त्याच्या बाजूला कुंडमाळा गाव या विरुद्ध असलेले शेकारवाडी गाव या दोघांना जोडणारा लोखंडी साकव स्थानिकांना व शेतकऱ्यांना रोजच्या रहदारीसाठी सुमारे ३० वर्षांपूर्वी उभारण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र हा पुल अलीकडच्या काळात जीर्ण झाल्याच्या तक्रारी व नूतनीकरणाची मागणी ग्राम स्थांकडून वेळोवेळी करण्यात येत होती. या बाबीकडे विशेष लक्ष दिले असते तर कदाचित ही घटना आज टळली असती. एकंदरीत प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे ही दुर्घटना ओढवली असे म्हणणे गैर ठरणार नाही. कुंडमाळ्यामध्ये वीकेंडला आठ ते दहा हजार पर्यटकांची गर्दी होत असते. दुर्घटनेच्या दिवशी गर्दीचा उच्चांक होता. आधीच पुल जीर्ण असल्यामुळे पुलावर असलेल्या दीडशे ते दोनशे लोकांचा भार न सोसल्यामुळे पुल पर्यटकांसह खळखळत्या इंद्रायणीच्या पात्रात कोसळला. प्रत्यक्षदर्शी पर्यटकांनी घटनेच्या पाच मिनिटे आधी पुल थरथर कापत असल्याचे सांगितले आहे. मुळात पुल हा ओव्हरलोड सहन न झाल्यामुळे दुर्घटना घडल्याचे हे आता स्पष्ट होते. देशासह राज्यात दरवर्षी प्रामुख्याने पावसाळ्यात पुल खचणे,वाहून जाणे आदीं सारख्या घटना होतात. परंतु ज्यावेळेस मोठी जीवित हानी होते, तेव्हा मात्र प्रशासनाला जाग येते. हेच मोठे दुर्दैव आहे. देशातील रस्ते दळणवळणाचे महामार्ग, विकासाचे पहिले मानले जात असताना पुलांच्या स्ट्रक्चरल ऑडिट होत नसल्याच्या बातम्या वेळोवेळी येतात. राज्यात अनेक भागात आजही ब्रिटिशकालीन पुलांची संख्या मोठी आहे.त्या पुलांची अवस्था डळमळीत आहे.राज्यातील असंख्य मार्गावरील पूल अनेक वर्षांपासून अपूर्ण व्यवस्था अवस्थेत दिसून येतात.मुळात पावसाळ्याच्या तोंडावर ते मुदतीत पूर्ण करून घेणे प्रशासनाची जबाबदारी नव्हे काय? निर्माणाधिन पूलांच्या कामाच्या ठिकाणी पर्यायी पुल वाहतुकीसाठी असतो. परंतु तो पुरामुळे टिकेलच याची हमी नसते. शिवाय ते कमी उंचीचे असल्यामुळे त्या पुलावरील पावसाचे पाणी दोन-दोन दिवस ओसरत नाही. नाईलाजाने न परवडणाऱ्या खडतरआणि लांबच्या मार्गाने प्रवास करावा लागतो.

सामान्य नागरिकांना होणारा मानसिक, शारीरिक त्रासाशिवाय वाहनावर होणारा वाढत्या इंधनाचा बोझा लादला जातो. एकीकडे अब्जावधी रुपये खर्चून जलद महाम ार्ग बनवण्याकडे शासनाचे विशेष लक्ष असते.तर दुसरीकडे ग्रामीण भागातील रस्ते व त्यावरील पुलांकडे अक्षम्य असे दुर्लक्ष का! रस्ते व पूल विकासाचे द्योतक मानले जात असतानाच याचे संरक्षण व संवर्धन होणे तेवढेच गरजेचे नाही का..?





शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

## मुरुम शहरातील शाळांमध्ये नवागतांचे स्वागत उत्साहात आणि थाटात

### जिल्हा परिषद स्पेशल शाळेच्या बाल विद्यार्थ्यांची ट्रॅक्टरमधून मिरवणूक

आरंभ मराठी | मुरुम

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांनंतर सोमवारी (ता.१६ जून) मुरुम शहरातील विविध शाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे शालेय जीवनात आगमन अत्यंत उत्साहात आणि थाटामाटात साजरे करण्यात आले. शाळा परिसरात फुलांच्या रांगोळ्या, फुगे, पताका आणि संगीताच्या गजरात ''शाळेच्या पहिल्या दिवशी'' विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या स्पेशल प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद कन्या प्रशाला व प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद मुलांची शाळा, तसेच गुरुकुल प्री-प्रायम री शाळा, शांतिनिकेतन शाळा, प्रतिभा निकेतन विद्यालय, ज्ञानदान विद्यालय यांसह शहरातील इतर सर्वच शाळांमध्ये नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत विविध उपक्रमांनी करण्यात आले.शाळांच्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, टॉफी, गिफ्ट, स्वागतगीत आणि छोट्या छोट्या सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे नवशिक्यांचे मनोबल वाढवले.काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी रंगीत झेंड्यांचे हातात घेऊन प्रभातफेरीही काढली. शाळांमध्ये आई-वडिलांसह आलेल्या लहानग्यांचा उत्साह व नव्या वाटचालीबद्दलची उत्सुकता नजरेत भरत होती. विशेष म्हणजे, काही शाळांमध्ये शिक्षकांनी हातात पोस्टर घेऊन ''शाळा ही ज्ञानाचे मंदिर'', ''वाचन संस्कृती वाढवा'', ''स्वच्छता राखा'', अशा सामाजिक संदेशांद्वारे विद्यार्थी व पालकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण केले. जिल्हा परिषद स्पेशल प्राथमिक शाळेच्या बालकांना शाळेत आगमन करण्यापूर्वी शहरातून मिनी ट्रॅक्टर मध्ये बसवून मिरवणूक काढण्यात आली.मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शाळेच्या नियमांची ओळख करून देत शिक्षणाविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन दिले. काही शाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांसाठी ओळख सत्र, खेळ, चित्रकला, गाणी यांचे आयोजनही करण्यात आले. मुरुम शहरातील सर्वच शाळांमध्ये पहिल्याच दिवशीच शंभर टक्के उपस्थिती असल्याचे शिक्षकांनी समाधानाने नमूद केले.''शाळा हा केवळ अभ्यासाचा नव्हे तर आनंदाचा केंद्रबिंदू आहे,'' असे प्रतिपादन काही शिक्षकांनी यावेळी केले. शाळेतील या स्वागत सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन वर्षाच्या प्रारंभीच शिक्षणाविषयी उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे.





## येरमाळा येथे नवोदित विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी; फेटे बांधून केले विद्यार्थ्यांचे स्वागत

आरंभ मराठी | येरमाळा

कळंब तालुक्यातील येरमाळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात आणि अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. सोमवार पासून २०२५ - २६ च्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. जिल्हा परिषदेच्या शाळेम धील पटसंख्या आणि गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्या अनुषंगाने येरमाळा जि.प. च्या शाळेमध्ये पट वाढीसाठी उन्हाळी सुट्टीमध्येच प्रवेश करून घेतले गेले. दोन दिवसांपूर्वी शाळेची पुर्ण साफसफाई करण्यात आली. नवागतांच्या स्वागतासाठी शाळेच्या प्रांगनामध्ये रांगोळी काढण्यात आली होती. सजावट करण्यात आली होती. सकाळी गावामधून सर्व विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. घंटा वाजल्यानंतर विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून, पुष्पहार व फेटा घालुन औक्षण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षणाधिकारी योजना नागेश मापारी, व शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते गणवेश व पाठ्य पुस्तकाचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शालेय जिवनातील पहिले पाऊल अविस्मरणीय ठरावे यासाठी त्यांच्या पायांचे ठसे घेण्याचा विशेष उपक्रम राबविला गेला. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजनात विद्यार्थ्यांना गोड पदार्थ देण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी योजना नागेश मापारी, येरमाळा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी, केंद्रप्रमुख अनिल बारकुल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास बारकुल, उपाध्यक्ष बेदरे मॅडम, सदस्य संदीप देशमुख, विजयकुमार बारकुल, जाधव मॅडम, वाघमारे मॅडम, देशमुख मॅडम, आगलावे सर यांच्यासह अनेक पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शेरखाने सर यांनी केले तर आभार पडवळ सर यांनी मानले.





हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
बुधवार दि.18 जून 2025

# कळंबमध्ये उभारणार स्क्वैश कोर्ट

## खेळाडूंसाठी ठरणार मैलाचा दगड-आमदार कैलास पाटील

आरंभ मराठी | धाराशिव







कळंब शहरातील क्रीडा संकुल येथे अतिशय दर्जेदार व अद्ययावत स्क्वैश कोर्टची उभारणी आमदार कैलास पाटील यांच्या पुढाकारातून होत आहे. (ता. १६) रोजी या कोर्टच्या बांधकामाचे भूमीपूजन करण्यात आले आहे. या कोर्टमुळे सामान्य खेळाडूंना मोठा फायदा होणार असून व नवीन खेळाडू तयार होण्यास मदत मिळणार आहे. स्क्वैश हा दोन खेळाडूंनी खेळला जाणारा एक रॅकेट खेळ आहे .यात खेळाडू एका बंदिस्त कोर्टमध्ये समोरच्या भिंतीवर चेंडू मारण्याचा प्रयत्न करतात आणि प्रतिस्पर्ध्याला तो परत मारणे आवश्यक असते .हा खेळ शारीरिकदृष्ट्या तगडा आणि जलद असतो. स्क्वैशचा सामना साधारणपणे पाच गेम्स पैकी सर्वोत्तम असतो .म्हणजे जो खेळाडू तीन गेम जिंकतो तो सामना जिंकतो. एक उत्कृष्ट हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी व्यायाम आहे .या खेळामध्ये वसुंधरा नांगरे हिची एशियन गेम्स स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. तसेच जिल्हास्तरावर ६५० खेळाडू ,विभाग स्तरावर २०० खेळाडू, राज्यस्तरावरती ७०० खेळाडू, राष्ट्रीय स्तरावरती १७ खेळाडूंनी, प्राविण्य प्राप्त केलेले आहे. जिल्ह्यात खेळाडू देशभर वेगवेगळ्या खेळात चमकत आहेत. पारंपारीक खेळाकडं जसे खेळाडू आकर्षित होतात अगदी त्याचप्रमाणे अश्या वेगळ्या खेळात देखील आता खेळाडू वळत आहेत. तेव्हा अश्या खेळाडूच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्याचा विचार करून आमदार कैलास पाटील यांनी हे कोर्ट उभारणी करिता पुढाकार घेतला आहे. त्याचबरोबर क्रीडा संकुल चे प्रवेश द्वार ची दुरुस्ती, संरक्षण भिंतीची दुरुस्ती, पाण्याची व्यवस्था व इतर अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. सोमवारी त्याच्या भूमिपूजनाचा उदघाटन सोहळा पार पडला.साधारण अडीच कोटीच्या निधीतून उभारण्यात येणार हे अद्ययावत कोर्ट खेळाडूंना मैलाचा दगड ठरेल असा विश्वास आमदार कैलास पाटील यांनी व्यक्त केला आहे.यावेळी तहसीलदार हेमंत ढोकळे, उपभियंता वायकर,दिलीप बापू पाटील, प्रदीप बाप्पा मेटे,संजय मुंदडा,सचिन काळे,सागर मुंडे, मनोहर धोंगडे,संदीप पालकर, मेघराज मुंडे,संजय जी मुंदडा,शंकर वाघमारे, श्याम नाना खबाले,रुकसाना भाभी,प्रतीक गायकवाड, मंदार मुळीक, जिलानी कुरेशी, नदीम मुलानी, सागर मुंडे, नाना थळकरी,गोविंद चौधरी प्रदीप फरताडे,विकास हौसलमल, रणजीत टेकाळे, राहुल पाटील,पंडित देशमुख, संतोष लांडगे,सुभाष बापू चोंदे, आबासाहेब मुळीक,निखिल कापसे, शशिकांत पाटील, मेघराज मुंडे,रितेश लंगडे, सागर लोमटे तसेच क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# तुळजापूर नगर परिषद शाळेत पहिल्याच दिवशी ७५ प्रवेश



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील तुळजापूर खुर्द येथील ९००१: २००८ मानांकित शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांची मोठी रांग लागल्याचे दिसून आले. शाळेमध्ये इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये पहिल्याच दिवशी ७५ पालकांनी आपल्या पाल्याचे प्रवेश कायम केले. त्याचबरोबर आणखी २५ विद्यार्थी वेटिंग वर आहेत. शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे तुळजाई परिवारातर्फे गुलाब पुष्प आणि पेन देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मा.नगराध्यक्ष पंडितराव जगदाळे, पतसंस्थेचे चेअरमन राजाभाऊ देशमाने , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा लक्ष्मीताई रणजीत भोजने, मुख्याध्यापक तुकाराम मोटे, शिक्षण विभागप्रमुख अशोक शेंडगे,तुळजाई गणेश मंडळाचे अध्यक्ष ॲड.बालाजी देशमाने, सचिव संजय ढवळे, नानासाहेब भोजने, संजय देशमाने , अशपाक सय्यद ,पटेल सर, बालाजी जाधव, रणजीत भोजने, सचिन ठेले,भगवान सुरवसे सर ,मोनिका गोसावी, प्रमोद क्षीरसागर, ॲड.प्रतीक जगदाळे ,सुरज जगदाळे ,बालाजी जाधव ,एम.डी बोडरे, रेणुका जाधव, इंद्रजित जगदाळे, रोहित भोजने यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक स्टाफ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक शेंडगे यांनी तर आभार मुख्याध्यापक तुकाराम मोटे यांनी मानले. यावेळी पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसून आली. केवळ उत्कृष्ट गुणवत्ता आणि सुंदर उपक्रमांचे आयोजन यामुळे शाळेत प्रवेशासाठी रांगा लागल्याचे दिसून आले.

## विविध वृत्त

# भूम शहरात एटीएम लुटले, ८ लाख ८४ हजार रुपये लंपास

आरंभ मराठी | भूम

भूम शहरात अज्ञात चोरट्यानी एटीएम मशिनमधील तब्बल ८ लाख ८४ हजार रुपयांची रक्कम लंपास केली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, दिनांक १५ जून रोजी पहाटे अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास भुम शहरातील खुशी कॉम्पलेक्स कुसुम नगर येथील एस बी आय बॅकेच्या एटीएम मशीन येथे अज्ञात व्यक्तीनी एटीएम मशीनच्या उघाड्या दरवाज्यातुन आत प्रवेश केला. चोरट्यानी एटीएम मशीन गॅस कटरने कट करून त्याचे नुकसान करुन एटीएम मधील रोख रक्कम ८,८४,५०० रुपये चोरुन नेले. फिर्यादी अभय बाळासाहेब सांळुके (वय ३६ वर्षे, व्य- चॅनल इक्झीकेटीव हिताची पेमेंट सर्व्हिसेस रा. स्वामी समर्थ नगर ओल्ड एम आय डी सी रोड लातुर) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०५,३२४(५), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# साहित्य परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी भागवत घेवारे यांची निवड



आरंभ मराठी | धाराशिव

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती संस्थेची बैठक देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे यांच्या उपस्थितीत झाली. युवराज नळे यांची प्रांत मंत्री म्हणून नियुक्ती झाल्यामुळे रिक्त झालेल्या धाराशिव जिल्ह्याच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक गझलकार भागवत घेवारे यांची एकमताने निवड करण्यात आली. साहित्य भारतीच्या माध्यमातून अधिकाधिक साहित्यिकांना व्यासपीठ व प्रोत्साहन देण्याचा मनोदय नवनियुक्त अध्यक्ष भागवत घेवारे यांनी व्यक्त केला. त्यांच्या निवडीनंतर प्रांत मंत्री युवराज नळे, साहित्य भारतीचे मार्गदर्शक राजेंद्र अत्रे, कार्यवाह रविंद्र शिंदे, समाधान शिकेतोड यांनी श्री घेवारे यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदनहोतआहे.

# येडशी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात



आरंभ मराठी |येडशी

येडशी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत सोमवारी (दि.१६) प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सल्लाउद्दीन शेख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका श्रीमती खदीरा पठाण, शिक्षिका शबाना शेख, शिक्षक मिर्झा असिफ बेग, प्रशिक्षिका कु. सना पटेल, बाबा काजी, अन्वर पटेल, आरिफ पटेल यांच्यासह महिला पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खेड येथे विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेऊन स्वागत



आरंभ मराठी | तेर

धाराशिव तालुक्यातील खेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांची गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. शाळेत पहिली मध्ये दाखल नवोदित विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. पहिलीच्या विद्यार्थ्यांचे पावलांचे ठसे घेण्यात आले. शाळेतील सर्व विदयार्थ्यांना मोफत पाठयपुस्तक, गणवेश आणि बुट व सॉक्स वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा. व्य. समितीचे अध्यक्ष रविंद्र वीर पाटील होते तर प्रमुख पाहुणे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतिश हरिदास होते. यावेळी.शाळेचे मु अ. शिवदास बुंदे शा . व्य . समिती उपाध्यक्षा प्रगती विजयसिंह गरड , समुदाय आरोग्य अधिकारी डॉ प्रशांत खडके, शा. व्य . सदस्य . प्रदीप दांगट, किशोर लोमटे व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोल्हापुरातल्या सुप्रसिद्ध जना बँकेत ५० दात्यांचे रक्तदान



आरंभ मराठी | कोल्हापूर

कोल्हापुरातील रक्ताच्या तुटवड्याबद्दल विविध सेवा संस्थांच्या पुढाकारातून विविध ठिकाणी रक्तदान शिबिर आयोजन केले जात असून,कोल्हापुरातील सुप्रसिद्ध दाभोळकर कॉर्नर इथल्या जना बँकेच्या पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक भान जपत रक्तदान शिबिर शिबिराचे आयोजन केले. यावेळी ५० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनासाठी बँकेचे शाखा व्यवस्थापक आतेशाम हवेरी, विश्वजीत राणे, आर. व्ही. ढाले,दिग्विजय पाटील,दैनिक आरंभ मराठीच्या उपसंपादक सुनिता त्रंबके यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.या शिबिरातून बँकेने सामाजिक बांधिलकी जपत मोलाचा संदेश दिला आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगदंबानगर कडदोरा पहिलं पाऊल वृक्ष लावून अनोखा उपक्रम

आरंभ मराठी | उमरगा



तालुक्यातील कडदोरा येथील जगदंबा नगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात एका आगळ्यावेगळ्या आणि पर्यावरणपूरक उपक्रमाने करण्यात आली.'पहिलं पाऊल वृक्ष लावून' या उपक्रमांतर्गत, विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले आणि प्रत्येक विद्यार्थ्याने एक वृक्ष लावून आपल्या शैक्षणिक प्रवासाचा श्रीगणेशा केला.प्रवेश फेरी दरम्यान, विद्यार्थ्यांना गाडीतून आणण्यात आले. शाळेत पोहोचल्यावर त्यांचे औक्षण करून आणि 'पहिलं पाऊल' उमटवून अनोखे स्वागत करण्यात आले. या उपक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'एक मूल, एक वृक्ष' लागवड. प्रत्येक विद्यार्थ्याने शाळेच्या परिसरात एक रोपटे लावले, जे त्यांच्या वाढीसोबतच पर्यावरणाचीही काळजी घेईल. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमेश रणखांब, उपसरपंच खंडू बालकुंदे, तसेच माजी अध्यक्ष सागर रणखांब आणि जगन्नाथ चौधरी उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त उमेश खोसे, सहशिक्षिका पुष्पलता पांढरे, स्वयंपाकी गुलमल रणखांब आणि राजेंद्र रणखांब यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

# प्रतिक्षित घोगरे यांची पशुधन पर्यवेक्षकपदी निवड

आरंभ मराठी |गोविंदपूर



कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथील प्रतिक्षित प्रदिप घोगरे यांची पुणे जिल्हा परिषद अंतर्गत पशुधन पर्यवेक्षक पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांतर्फे फेटा बांधून शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या निवडी बद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी सरपंच आशोक मस्के, उपसरपंच संतोष मुंडे, अनंत घोगरे, भास्कर मुंडे , अनिल मुंडे, हिरालाल मुंडे, भगवान घबाडे , सुभाष सोनवणे, रघुनाथ मुंडे, लालासाहेब माळी, वसंत जाधव, शाहाजी सुरवसे, प्रदिप घोगरे, प्रताप घोगरे, बाळासाहेब मुंडे, शंकर मेनकुदळे, कबन मुंडे, चंदुलाल मुंडे, मधुकर मिसाळ, बापू बिडवे, बालाजी माळी, उत्तम मुंडे, आत्माराम सौदागर, बालाजी बिडवे, उत्तम जाधव, जिवराज मुंडे , बाबुराव निकम, मधुकर सुरवसे, तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय जीवनात शिस्त, संयम व कष्ट करण्याची जिद्द अंगी बाळगावी

## उमरगा येथील प्रवेशोत्सव कार्यक्रमात मल्लिकार्जुन दंडगे यांचे प्रतिपादन

आरंभ मराठी | उमरगा





शालेय जीवनात शिस्त, संयम व कष्ट करण्याची जिद्द अंगी बाळगली, तर कठिणातील कठीण काम सोपे होऊन जाते. त्यामुळे शाळेच्या नियमांना अनुसरून विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे व आपले व आपल्या संस्थेचे नाव उज्वल करावे असे प्रतिपादन मल्लिकार्जुन आप्पा दंडगे यांनी केले. उमरगा येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये सोमवारी (दि.१६) दीर्घ सुट्टीनंतर शाळा सुरू झाली. त्याप्रसंगी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे अध्यक्षपदावरून बोलत होते. याप्रसंगी संचालक प्रवीण अनुदुरकर, मुख्याध्यापिका सविता लोहार, ज्येष्ठ शिक्षक गोपाळ आष्टे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रवीण अनुदुरकर म्हणाले की, चारित्र्य, संयम व निष्ठेला महत्त्व देऊन आजच्या विद्यार्थ्यांनी आपले आचरण ठेवावे. आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार आपले वर्तन ठेवले तर निश्चितच भावी आयुष्य उज्वल व संपन्न होणार आहे. याप्रसंगी इयत्ता पहिली व इतर वर्गात नव्याने दाखल झालेल्या नवागत विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. दीर्घ सुट्टीनंतर शाळा सुरू झाल्याने पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे शालेय परिसर गजबजून गेला होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. या प्रसंगी इयत्ता पहिली व इतर वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पुस्तक देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता भावसार, यांनी तर प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक गोपाळ आष्टे तर आभार विवेक जाधव यांनी मानले.

# बिल गेट्स ज्युनिअर कॉलेजच्या आयुष नागणे याचे नीट परीक्षेत ४९७ गुण मिळवत यश

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव येथील बिल गेट्स ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी आयुष नागणे याने नीट परीक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. नीट २०२५ साठी घेण्यात आलेल्या परीक्षेत आयुष त्याने ४९७ गुण घेत यश संपादन केले. त्याचा ऑल इंडिया रँक ५४,९०० आला आहे. त्याच्या यशाबद्दल त्याचा बिल गेट्स महाविद्यालयामध्ये पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. आयुषच्या या यशाबद्दल श्री कुलस्वामिनी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्राचार्य डॉ. रमेश दापके-देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आयुष सोबतच त्याचे आजोबा नागनाथ नागणे, वडील डॉ. अविनाश नागणे यांचाही सन्मान करण्यात आला. आयुष याने केलेल्या कष्टाचे प्राचार्य डॉ. रमेश दापके-देशमुख यांनी कौतुक करून चांगल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी शुभेच्छा दिल्या. बील गेट्स ज्युनिअर कॉलेज मधील हा ला प्रवेशीत होणारा चौथा विद्यार्थी असून, अनेक विद्यार्थी , ला प्रवेशीत झाल्याचे सांगून कॉलेज करत असलेल्या प्रयत्नाचेही कौतुक केले. त्यावेळी बिल गेट्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरशद रजवी, सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलचे संचालक व प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. दिग्गज दापके-देशमुख, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सोमनाथ लांडगे, प्रा. शिवसांब कुंभार, प्रा. ज्ञानदेव जमाले, प्रा. वसंत पाटील, प्रा. आरशिया मोमीन, प्रा. दिशा गालटे, प्रा. संध्या नाईकवाडे उपस्थित होते.

# संगणक आधारित डिझाईन सॉफ्टवेअर ऑटोकॅड आणि कटिया विषयावर तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण

आरंभ मराठी | धाराशिव







मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाशी संबंधित असलेले कॉम्प्युटर डिझाईन सॉफ्टवेअर ऑटोकॅड आणि कटिया या विषयावर नुकतेच तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात प्रशिक्षण संपन्न झाले. फक्त अभियांत्रिकीची पदवी घेऊन सद्या चालत नाही, तर सध्याच्या स्पर्धेच्या युगात विविध कौशल्यावर आधारित, सॉफ्टवेअरच्या माध्यमातून संबंधित विभागातील ज्ञान घेणे, स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी सीडीएस ट्रेनिंग सेंटर धाराशिव चे संचालक फिरोज मणियार यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल एक महिना हे प्रशिक्षण महाविद्यालयाच्या कॅड लॅब मध्ये आयोजित केले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, शहरी भागामध्ये अशा प्रकारच्या सॉफ्टवेअरच्या प्रशिक्षणासाठी हजारो रुपये फी भरावी लागते. परंतु अत्यंत अल्प फी मध्ये महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण उपलब्ध करून दिलेले आहे. विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटच्या कामात याचा नक्कीच उपयोग होईल. विद्यार्थ्यांनी इंडस्ट्रीजसाठी लागणारे वेगवेगळे मॉडेल्स, प्रोजेक्ट बनविण्याचे कौशल्य या प्रशिक्षणातून आत्मसात केले. एखाद्या पार्ट ची डिझाईन कशी करावी? हेही त्यामुळे त्यांना लक्षात येणार आहे. या प्रशिक्षणाचे समन्वयक म्हणून प्रा एस पी बिरादार यांनी काम पाहिले. तसेच प्रा एस डी शिंदे, प्रा आर एम शेख, प्रा बी.जी कदम यांनी विशेष सहकार्य केले. सतत एक महिना चाललेल्या या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे विभाग प्रमुख डॉ डी डी दाते यांनी सांगितले.

# महिला शेतकरी शेख परवीन फकरुद्दीन यांना स्व.राजेंद्र मुंदडा कृषी वैभव पुरस्कार

आरंभ मराठी | शिराढोण



कळंब तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा स्व.राजेंद्र मुंदडा कृषी वैभव पुरस्कार निपाणी ता. कळंब येथील महिला शेतकरी शेख परवीन फकरुद्दीन यांना पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे यांनी जाहीर केला. या पुरस्काराचे हे चौथे वर्ष आहे. गेल्या तीन वर्षांपासून कळंब तालुक्यातील शेती मध्ये अभिनव प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यास पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. या पूर्वी नामदेव माकोडे, लिंबा नाना चोंदे,अप्पासाहेब काळे यांना सन्मानित करण्यात आले होते. या वर्षी शेती मध्ये विविध प्रयोग करून, शेतकऱ्या पुढे आदर्श निर्माण करणाऱ्या निपाणी तालुका कळंब येथील महिला शेतकरी परवीन फकरुद्दीन शेख यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती कळंब तालुका पत्रकार संघाचे विश्वस्त सतीश टोणगे व अध्यक्ष अशोक शिंदे यांनी दिली.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव.

बुधवार दि.18 जून 2025

# तुळजापूर शहरात जागोजागी कचऱ्याचे ढीग, दुर्गंधीमुळे नागरिकांसह भाविक हैराण

## महिन्याला २४ लाख रुपयाचा ठेका देऊनही शहरात अस्वच्छता

## दुर्गंधीमुळे साथीचे रोग पसरण्याची भीती

सुरज बागल | आरंभ मराठी

तुळजापूर-महाराष्ट्राची आई कुलस्वामिनी तुळजाभवानीच्या पुण्यपावन तुळजापूर नगरीत स्वच्छतेचा बोजवारा उडला असून, जिकडेतिकडे घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र दिसत आहे. जागोजागी कचऱ्याचे ढीग तसेच दुर्गंधीयुक्त घाण पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील स्वच्छतेचा ठेका पिंपरी येथील समृद्धी फॅसिलिटी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडे आहे. यासाठी महिन्याला जवळपास २४ लाख रुपये नगर परिषदेकडून या कंपनीला देण्यात येतात. मात्र तरी देखील शहरात अनेक ठिकाणी अस्वच्छता दिसत असून याबाबत नागरिकांसह भाविक ही नाराजी व्यक्त करत आहेत.



तुळजापूर शहरात सरासरी दररोज ४० हजार भाविक येत असतात. त्यामुळे शहरात बाहेरून येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र तरी देखील शहरातील स्वच्छतेकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होत असून, दरमहा २४ लाख इतकी मोठी रक्कम देऊनही शहर पूर्णपणे स्वच्छ होत नसल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. सध्या पावसाळा सुरू होत असून अनेक ठिकाणी नालेसफाई देखील झाली नाही. त्यामुळे ड्रेनेज मधील घाण पाणी देखील रस्त्यावर वाहताना दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वीच एका भाविकाची गाडी घाटशीळ रोड येथील पार्किंग समोरील ड्रेनेज मध्ये अडकली होती. याबाबत 'आरंभ मराठी' ने आवाज उठवताच त्या ड्रेनेजची तात्काळ दुरुस्ती करण्यात आली. दरम्यान शहरात अनेक अजून काही ठिकाणीही घाण पाणी रस्त्यावर वाहत असून या पाण्याची विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. अन्यथा पावसाळ्यातील साथीच्या रोगांना नागरिक मोठ्या प्रमाणावर बळी पडण्याची शक्यता आहे. काही दिवसापूर्वी एका भाविकाने शहरातील अस्वच्छतेचा व्हिडिओ काढून सोशल मीडियावर टाकला होता. यामुळे शहराची मोठ्या प्रमाणात बदनामी होत असल्याची भावना स्थानिक नागरिकांसह पुजारी बांधव व्यक्त करत आहेत. सध्या पावसाचे दिवस असून, अस्वच्छतेमुळे साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे पालिकेने शहर आणि परिसरातील स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

### आठ दिवसांपूर्वी दिलेल्या निवेदनाची दखल नाही

शहरातील भवानी कुंड परिसरातील नाल्याची स्वच्छता करण्यासाठी आठ दिवसापूर्वी लेखी निवेदन नगर परिषदेकडे दिले आहे. मात्र तरी देखील याची दखल घेतली गेलेली नाही. शहरात अनेक ठिकाणी अस्वच्छता पसरलेली असून यावर तात्काळ उपयोजना करण्याची गरज आहे.

**-बबन गावडे**
**सोशल मीडिया तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी.**

### स्वखर्चाने केली स्वच्छता

आमच्या भागातील चंद्र कुंड परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा पडलेला असतो. त्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. काही दिवसापूर्वीच स्वखर्चातून येथे स्वच्छता करून घेतली होती. तसेच याबाबत नगरपरिषदेला वारंवार विनंती देखील केली आहे. मात्र त्याची दखल घेतली गेली नसल्याने या भागात मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता पसरली आहे .

**-बालाजी तट**
**सामाजिक कार्यकर्ते, जिजामाता नगर.**

### महिन्याला २४ लाख खर्च करूनही घाणीचे साम्राज्य

शहरातील स्वच्छतेसाठी महिन्याला २४ लाख रुपयांचा खर्च करण्यात येतो. मात्र तरी देखील शहरात अनेक ठिकाणी कचराकुंड्या ओसंडून वाहत आहेत. शहरात कचरा उचलण्यासाठी अधिकची वाहने तसेच मनुष्यबळ लावण्याची गरज असून, शहरातील नागरिकांचे आरोग्याच्या दृष्टीने लवकरात लवकर याबाबत उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**-अमोल जाधव तालुकाध्यक्ष**
**शिवसेना शिंदे गट**

# हुतात्मा वेदप्रकाश यांच्या नावाने उमरगा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण

## आमदार स्वामी यांच्या हस्ते झाले अनावरण



आरंभ मराठी | उमरगा

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरगा याचे नामकरण ''हुतात्मा वेदप्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरगा जि. धाराशिव'' असे करण्यात आले असून, त्यानिमित्ताने भव्य नामांतरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योगपती तथा आयएमसीचे चेअरमन प्रदीप पाटील हे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन प्रवीण औताडे (जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, धाराशिव), सुभाष इंगळे, संतोष वकारे, डॉ. दास हारके, राजेंद्र हारके, सुभाष हारके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात हुतात्मा वेदप्रकाश हारके यांच्या प्रतिमेचे पूजन व फलकाचे अनावरण करून करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली व प्रतापसिंह चव्हाण यांनी त्यांची यशोगाथा गीताच्या माध्यमातून सादर केली. आमदार प्रवीण स्वामी यांनी गुंजोटी गावातील निजामशाही विरोधातील लढ्यात बलिदान दिलेल्या हुतात्मा वेदप्रकाश हारके यांच्या देशभक्तीचा इतिहास आणि त्यांचे प्रेरणादायी कार्य मांडले. प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्येक अडचणीला धैर्याने सामोरे जावे, माध्यमांचा योग्य वापर करावा, आणि थोर विचारवंतांचे विचार आचरणात आणावेत, असे मार्गदर्शन त्यांनी केले. यावेळी संतोष वकारे आणि डॉ. दास हारके यांनीही आपल्या भाषणातून प्रशिक्षणार्थ्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाचा समारोप प्रदीप पाटील यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. या यशस्वी कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे प्राचार्य एस. व्ही. माळकुंजे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. गटनिदेशक, शिक्षक, शिक्षिका यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण औताडे यांनी करताना संस्थेच्या नामांतरणाची पार्श्वभूमी, बदल व त्याचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन पी.एस. नाईकवाडे यांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने पार पाडले. गुंजोटी गावातील अनेक मान्यवर, स्वातंत्र्यसेनानींचे वंशज, तसेच संस्थेतील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# पहिल्या दिवशी पळसप जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

## आमदार विक्रम काळे,गट शिक्षणाधिकारी सय्यद यांची उपस्थिती

आरंभ मराठी | पळसप





धाराशिव तालुक्यातील पळसप येथे जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे मोठ्या थाटात स्वागत करण्यात आले. नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. या कार्यक्रमादरम्यान मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षणाचे महत्व पटवून देताना मुलींच्या शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले. शिक्षणाशिवाय समृद्धी आणि प्रगती नाही शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि शिक्षणानेच माणूस गुरगरल्याशिवाय राहत नाही असे सांगून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. तसेच गट शिक्षण अधिकारी सय्यद यांनी शाळेच्या पटसंख्येबद्दल कौतुक केले व आज सर्व शाळेत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि शालेय पुस्तके वाटप करण्यात येणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमा दरम्यान मान्यवरांच्या हस्ते प्राथमिक स्वरूपात विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंगे सर यांनी केले तर प्रास्तविक बिडवे सर यांनी केले. या कार्यक्रमाला गावाचे सरपंच सिद्धेश्वर काळे, उपसरपंच राम लाकाळ ग्रामसेवक कदम तसेच प्रशालेचे मुख्यध्यापक पोपट पवार सर, प्राथमिक चे मुख्यध्यापक भुजबळ सर, राष्ट्रवादी काँग्रेसचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे तसेच शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सरडे, उपाध्यक्ष दयानंद लाकाळ, तसेच प्रशालेचे शिक्षक खांडेकर सर, लाकाळ सर, कोळी सर, क्षिरसागर मॅडम, वाघमारे मॅडम, आनेराव मॅडम तसेच तंटामुक्त अध्यक्ष विजय करंजकर तसेच गावातील अच्युत गजधने,रामलिंग नरवडे, सरताज पटेल, महादेव निकम कल्याण लाकाळ, दयानंद नरवडे, गुलाब लाकाळ, श्रवण तुपे आदींसह गावातील पालक विद्यार्थी शिक्षणप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

# फार्मसी विभागाच्या ४२ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड




आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या फार्मसी विभागाने आयोजित केलेल्या रिक्रुटमेंट कॅम्पस ड्राईव्ह मधून रिलायन्स लाइफ सायन्सेस मुंबई व एजिओ फार्मसुटीकल पुणे या नामांकित फार्म कंपन्यांमध्ये तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तब्बल ४२ विद्यार्थ्यांची निवड झाल्याचे कॉलेजचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने याने संगितले. या ड्राईव्ह साठी ८० विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली होती. मुलाखतीची संपूर्ण प्रक्रिया कंपनीचे हेड एचआर विश्वनाथ पाटोळे, गोपाळ पाटील, राहुल आरे, नितीन कदम आणि संतोष स्वामी यांनी राबवली. मुलाखती मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. या वेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, या वर्षी भरपूर फार्मा कंपनी महाविद्यालयामध्ये कॅम्पस ड्राईव्ह साठी आल्या होत्या त्या मध्ये श्रेया लाइफ सायन्स , दास लॅब, हुमनीझ फार्मा , अँपोलो फार्म, टीसीएस, सिप्ला , ग्लॅक्सओ महाविद्यालयाची हि तिसरी बॅच बाहेर पडत असून दिवसेंगणिक महाविद्यालयाचे प्लेसमेंट मध्ये वाढ होताना दिसून येत आहे. या ड्राईव्ह चे आयोजन प्रा. अशोक जगताप आणि डॉ. गुरुप्रसाद चिवटे यांनी केले होते. तेरणा ट्रस्ट चे अध्यक्ष डॉ. पदमसिंह पाटील, संस्थेचे विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील, मल्हार पाटील, मेघ पाटील आणि व्यवस्थापकीय समन्वयक प्रा.गणेश भातलवंडे, फार्मसी विभाग प्रमुख डॉ. प्रीती माने व सर्व विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांनी यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# कायाकल्प व पर्यावरणपूरक सुविधामध्ये सास्तुर येथील स्पर्श ग्रामीण रुग्णालय राज्यात प्रथम

## २५ वर्षांच्या सातत्यपूर्ण कामगिरीत अनेक पुरस्काराने सन्मानित

आरंभ मराठी | लोहारा



ग्रामीण भागातील आरोग्यसेवेचा आदर्श बनलेले स्पर्श ग्रामीण रुग्णालय, सास्तूर यांनी 'कायाकल्प' आणि 'इको-फ्रेंडली' या दोन्ही राज्यस्तरीय गुणवत्तापूर्ण आरोग्य उपक्रमांत राज्यात प्रथम क्रमांक पटकावत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. केंद्र शासनाचा स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आरोग्य विभागाच्या उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय यांना महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत दिला जाणारा राज्यात प्रथम क्रमांकाचा मानाचा सर्वोच्च पुरस्कार धाराशिव जिल्ह्यातील स्पर्श ग्रामीण रुग्णालय सास्तुरला दिनांक १२ जून रोजी जाहीर झाला.

कायाकल्पमध्ये ९९.८६% गुण मिळवून तसेच इको फ्रेंडली फॅसिलिटी मध्ये ९२.५२% गुणांकन मिळवून २० लाखाचे प्रथम पारितोषक शासन तर्फे स्पर्श ग्रामीण रुग्णालयाला जाहीर झाले आहे.२५ वर्षे सातत्यपूर्ण कामगिरी करून राष्ट्रीय व राज्यपाताळीवरील अनेक पुरस्कार प्राप्त झाले. यावर्षी शासनामार्फत दोन विभागात हे पुरस्कार दिले गेले आहेत. रुग्णालयीन स्वच्छता दर्जेदार आरोग्य सेवा व सुविधा यासाठी प्रथम क्रमांकासाठी १५ लाख रुपये तर पर्यावरण पूरक (इको फ्रेंडली) रुग्णालय प्रथम क्रमांकासाठी ५ लाख रुपये पारितोषिक शासनाने जाहीर केले आहेत. हे दोन्ही राज्यात प्रथम क्रमांकाचे पुरस्कार स्पर्श ग्रामीण रुग्णालयाला जाहीर झाले. या पुरस्कारासाठी जिल्हा शल्यचिकित्स्य डॉ. धनंजय चाकूरकर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांचे सततचे मार्गदर्शन व प्रेरणा यामुळे हा पुरस्कार स्पर्शला मिळाल्याचे उद्गार रमाकांत जोशी यांनी काढले. कायाकल्प मध्ये मागील दोन वेळा स्पर्शला राज्यात द्वितीय क्रमांक मिळाला होता.यावेळी प्रथम क्रमांक मिळवून स्पर्शने आरोग्य सुविधेमध्ये सातत्य राखले. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आरोग्य सेवेत सातत्य टिकवले याबद्दलच सर्व स्तरावर स्पर्श ग्रामीण रुग्णाच्या अभिनंदन केले जात आहे.मागील वर्षी ४५१ गावांमधून ४ जिल्ह्यातून रुग्णांनी आरोग्य सेवेचा लाभ घेतला. छोटे ग्रामीण रुग्णालय अंतर्गत भागात असूनही लोकांच्या विश्वासास प्रात्र झालेले आहे. सुरक्षित बाळंतपणे इतर जनरल शस्त्रक्रिया, लहान बाळांचे अतिदक्षता बाह्य रुग्ण व अंतर रुग्णसेवा व प्रत्येकांशी आपुलकीचा संवाद शिवाय १२४ अंतर्गत गावामध्ये आरोग्य शिक्षण व आरोग्यसेवा इत्यादीमुळे स्पर्श लोकांचा विश्वास संपादन करू शकले.यशामागे एकजुटीने काम करणारी टीम, सक्षम नेतृत्व,ग्रामस्तरावर आरोग्य जागरूकतेचा अवलंब हे मुख्य घटक आहेत.रुग्णांप्रती आपुलकी दर्जेदार आरोग्यसेवा यामुळे एवढे मानाचे,प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाल्याची आणि कायाकल्पमध्ये स्पर्श राज्यात प्रथम झाल्यामुळे दर्जेदार आरोग्य सेवेची स्पर्शची जबाबदारी आणखी वाढल्याची भावना रमाकांत जोशी यांनी व्यक्त केली.

# आठ दिवसात पाणीप्रश्न सुटला नाही तर पालिकेला टाळे ठोकण्याचा इशारा

## नळदुर्ग पालिकेवर पाणी आणि स्वच्छतेच्या प्रश्नांसाठी संतप्त नागरिकांचा गाढव मोर्चा

आरंभ मराठी | नळदुर्ग

आठ दिवसात नळदुर्ग शहरात पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याबरोबरच नगरपालिकेला टाळे ठोकण्याचे आंदोलन करण्याचा इशारा पाणी प्रश्नासंदर्भात नगरपालिकेवर काढण्यात आलेल्या ''गाढव मोर्चा'' प्रसंगी बोलतांना संतप्त झालेल्या आंदोलकांनी दिला. त्यामुळे येणाऱ्या काळात नळदुर्ग शहरात पाणी व स्वच्छतेचा प्रश्न पेटण्याची शक्यता दिसुन येत आहे. नळदुर्ग शहरात पाणी व स्वच्छतेचा प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे. शहरात आठ - दहा दिवस नळाला पाणी येत नाही. त्याचबरोबर स्वच्छतेचा प्रश्नही शहरात गंभीर बनत चालला आहे. अस्वछतेमुळे शहरात डुकरांचा सुळसुळाट वाढला आहे. त्यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या शहरवासियांच्या वतीने सोमवारी (दि.१६) पाणी व स्वच्छतेच्या प्रश्नासंदर्भात नगरपालिकेवर गाढव मोर्चा काढण्यात आला. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी हा मोर्चा असताना स्वतःला राजकारणातील चाणक्य समजणाऱ्या काही लोकांनी



कारण नसताना याला राजकीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नागरिकांचा प्रशासनाच्या विरोधात असलेला हा मोर्चा भाजप विरुद्ध महाविकास आघाडी करण्याचा प्रयत्न झाला. फोनाफोनी केल्यामुळे काही जणांनी जाणीवपूर्वक या मोर्चाकडे पाठ फिरविली त्यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

या मोर्चामध्ये माजी नगराध्यक्ष शहेबाज काजी, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, शरीफ शेख, सुधीर हजारे, नवल जाधव,संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकुर, जोतिबा येडगे,सामाजिक कार्यकर्ते अजहर जागीरदार, मुकुंद नाईक, सतीश पुदाले,अलीम शेख, प्रमोद कुलकर्णी, शिवाजी गायकवाड, गणेश मोरडे, विजयसिंग ठाकुर,आमेर शेख,बबन चौधरी, मुदस्सर शेख, रमेश जाधव, संतोष मुळे, सुभाष कोरे, दयानंद स्वामी, शाम कनकधर बंडप्पा कसेकर, अबोद्दीन कुरेशी, रहेमान कुरेशी, गौस कुरेशी,धनाजी गायकवाड, बाबुराव वैद्य,दगडु डुकरे,सुनिल गव्हाणे, दत्ता राठोड यांच्यासह नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हा मोर्चा किल्ला गेट पासुन निघाल्यानंतर क्रांती चौक, चावडी चौक, महात्मा बसवेश्वर चौक, भवानी चौक, शास्त्री चौक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक मार्गे नगरपालिकेवर आल्यानंतर मोर्चाचे विसर्जन करण्यात आले. यावेळी मोर्चामध्ये गाढवांनाही सहभागी करण्यात आले होते. मोर्चातील गाढव व गाढवाच्या गळ्यात अडकविलेला फलक सर्वांचे लक्ष वेधुन घेत होते. यावेळी मोर्चातील नागरिकांनी नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना नगरपालिका प्रशासनाने आठ दिवसात शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याबरोबरच स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावला नाही तर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याबरोबरच नगरपालिकेला कुलुप घालण्याचे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला. यावेळी मोर्चेकऱ्यांनी नगरपालिकेचे खलील शेख यांना निवेदन दिले. यावेळी कांही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# उत्कृष्ट मतदान अधिकारी म्हणून लक्ष्मीकांत चव्हाण यांचा राष्ट्रीय स्तरावर दिल्ली येथे सन्मान




आरंभ मराठी | भूम

परंडा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक विभागाचे उत्कृष्टरित्या काम केल्याबद्दल निवडणूक आयोगाच्या वतीने दिल्ली येथे लक्ष्मीकांत चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. मतदान अधिकारी हा निवडणूक आयोगाचा कणा व श्वास असून तो अधिक सक्षम झाला पाहिजे. सध्या भारत निवडणूक आयोगाच्या भारत आंतरराष्ट्रीय लोकतंत्र व निर्वाचन प्रबंध संस्था, नवी दिल्ली यांच्या वतीने चार राज्यातील जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक, केंद्रास्तरीय मतदान अधिकारी यांच्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रशिक्षण व चर्चासत्र ११ ते १३ जून दरम्यान आयोजित केले होते. केंद्रस्तरीय मतदान अधिकारी यांना अधिक सक्षम करून निवडणूक आयोगाच्या बीएलओ ॲपमध्ये सुधारणा करून मतदार यादी अधिक निर्दोष बनविणे, ॲपमध्ये सुधारणा करणे या सारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. धाराशिव जिल्ह्यातील भूम- परांडा-वाशी मतदार संघातून ईट येथील मतदान अधिकारी लक्ष्मीकांत चव्हाण यांनी तेथील सर्व चर्चासत्रात भाग घेऊन आयोगाला अनेक सुधारणा सुचविल्या. या सुचविलेल्या सुविधांमुळे मतदार नोंदी अधिक अचूक व निर्दोष होणार आहेत. लक्ष्मीकांत चव्हाण यांनी निवडणूक आयोगाच्या ॲपमध्ये अनेक सकारात्मक बदल सुचविले, याची आयोगाने दखल घेतली. याबद्दल धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कुमार किर्ती पुजार, निवडणूक अधिकारी परांडा-२४३च्या मा.वैशाली पाटील मॅडम, भूमचे तहसीलदार मा. जयवंत पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.